Outward No. Minister/WCD/GENERAL/.९२./
Date : 06/04/2021

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
minister_wcd@gov.in

दिनांक : 06/04/2021

विषय:- अमरावती जिल्हयाकरीता संदर्भ क्र. ५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार लागू करण्यात आलेला लॉकडाऊन शिथिल करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सविनय सादर करण्यात येते की, आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या सूचना पत्रान्वये सुचित केल्यानुसार वेळोवेळी कोविड-१९ च्या अनुषंगाने आदेश निर्गमित करण्यात आले आहे. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०४/२०२१ च्या अधिसूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Break The Chain) ची घोषणा केलेली असून "(Break The Chain)" अंतर्गत अधिसूचनमध्ये निर्बंधाबाबतचे आदेश जारी केलेले आहे. त्यानुसार जारी केलेल्या अधिसूचनेतील अन्वये लागू करण्यात आलेले आदेश पूर्णत: अमरावती जिल्हयात दिनांक ३० एप्रील २०२१ पावेतो या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-४२३/२०२१ दि. ०५/०४/२०२१ अन्वये लागू करण्याबाबत करण्यात आले आहे.

**माहे फेब्रुवारी व मार्च** या दोन महिन्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णसंख्येमध्ये अमरावती जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता व वाढलेली रुग्ण संख्या कमी करण्याच्या अनुषंगाने अमरावती जिल्हयाकरीता या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/अ.का./गृह विभाग/को.प्रति.उपाय/कावि-२६५/२०२१ दि. २१/०२/२०२१ अन्वये अमरावती महानगरपालीकेच्या हद्दीचे जवळ असणाऱ्या गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनेची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/गृह विभाग/को.प्रति.उपाय/संचारबंदी निर्देश/आदेश/कावि-१९०/२०२१ दि. २७/०२/२०२१ अन्वये अमरावती जिल्हयातील प्रतिबंधित क्षेत्र वगळता इतर क्षेत्राकरीता निर्देश देण्यात आले तसेच या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/अ.का/गृह विभाग/को.प्रति.उपाय/कावि-१९१/२०२१ दि. २७/०२/२०२१ अन्वये अमरावती जिल्हयाच्या प्रतिबंधात्मक क्षेत्राच्या हद्दीजवळ असणाऱ्या गावांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनेची अंमलबजावणी बाबत निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार उपरोक्त ३ ही आदेशान्वये कोरोनाचा प्रसार रोखण्याकरीता दि. २० फेब्रुवारी ते दिनांक ०८ मार्च २०२१ पर्यंत अमरावती जिल्हयाकरीता लॉकडाऊन करुन कडक निर्बंध लावण्यात आले होते. त्यावेळी अमरावती जिल्हयातील रुग्णसंख्या ही खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | दिनांक | एकुण कोरोना बाधितांची संख्या | एकुण पॉझिटीव्हीटी रेट |
|---|---|---|---|
| १ | १५.०२.२०२१ | ४४९ | १८.७ |
| २ | १६.०२.२०२१ | ४८५ | २८.४ |
| ३ | १७.०२.२०२१ | ४९८ | ३२.२ |
| ४ | १८.०२.२०२१ | ५९७ | ३३.२ |
| ५ | १९.०२.२०२१ | ५९८ | २६.१८ |
| ६ | २०.०२.२०२१ | ७२७ | ३४.१ |
| ७ | २१.०२.२०२१ | ७०९ | २२.२ |
| ८ | २२.०२.२०२१ | ६७३ | २९.८ |
| ९ | २३.०२.२०२१ | ९२६ | ३७.५ |

Scanned with CamScanner

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*minister_wcd@gov.in*

दिनांक :

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २४.०३.२०२१ | ८०२ | ३३.१ |
| ११ | २५.०२.२०२१ | ९०२ | ३७.५ |
| १२ | २६.०२.२०२१ | ७५४ | ३८ |
| १३ | २७.०२.२०२१ | ६४० | २८.२ |
| १४ | २८.०२.२०२१ | ८९२ | ३५.६ |
| १५ | ०१.०३.२०२१ | २९२ | २२.९ |
| १६ | १०.०३.२०२१ | ५५४ | २६.३ |
| १७ | ११.०३.२०२१ | ४९१ | २०.३ |
| १८ | १२.०३.२०२१ | ४४८ | २५ |
| १९ | १३.०३.२०२१ | ३८३ | १४.७ |
| २० | १४.०३.२०२१ | ३८१ | १४.१ |
| २१ | १५.०३.२०२१ | ३७१ | १२.९ |
| २२ | २९.०३.२०२१ | ४४१ | १२.४ |
| २३ | ३०.०३.२०२१ | १०८ | ७.२ |
| २४ | ३१.०३.२०२१ | २५१ | १०.८ |
| २५ | ०१.०४.२०२१ | २८८ | १०.६ |
| २६ | ०२.०४.२०२१ | २७५ | १०.४ |
| २७ | ०३.०४.२०२१ | ३२५ | १४.४ |
| २८ | ०४.०४.२०२१ | ३०५ | ११.२ |
| २९ | ०५.०४.२०२१ | २४१ | ११.३ |

त्यानुसार मुख्य बाजारपेठ, मॉल्स, मार्केट हे बंद ठेवण्यात आले. जिवनावश्यक दुकाने यांची वेळ ही सकाळी ८.०० ते
दुपारी ३.०० व नंतर सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत करण्यात आली. त्यावेळेस अमरावती जिल्हयातील कोरोना
रुग्णांची संख्या ही दररोज सुमारे सरासरी ५०० ते ७०० इतकी दिसून येत होती.

परंतु सद्यस्थितीमध्ये ३० मार्च २०२१ पासूनच्या कोरोना बाबतचा आठवडी अहवालची पाहणी केली असता त्या
रुग्णसंख्येमध्ये लक्षणीय घट झालेली असून सद्यस्थितीमध्ये रुग्णसंख्या ही २०० ते २५० इतपर्यंत नियंत्रीत झालेली आहे.
त्यामुळे मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना
पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०४/२०२१ च्या अधिसूचनेनुसार या कार्यालयाकडील आदेश
जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-४२३/२०२१ दि. ०५/०४/२०२१ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार अमरावती
जिल्हयाकरीता लॉकडाऊन लावण्यात आला असून त्यानुसार अमरावती जिल्हयातील मुख्य बाजारपेठा, मार्केट मॉल्स व
जिवनावश्यक आस्थापना वगळता इतर सर्व प्रकारची दुकाने ही बंद ठेवण्यात आलेली आहे. सर्व प्रकारची खाजगी कार्यालये,
सिनेमागृहे, चित्रपटगृहे, बहुविध चित्रपटगृहे, नाट्यगृहे, प्रेक्षकगृहे, मनोरंजन पार्कस, आर्केडस, व्हिडीओ गेम पार्लर, वॉटर पार्क,
जलतरण तलाव, क्लब, जिम/व्यायामशाळा, क्रिडा संकुले बंद ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे याबाबत अमरावती
जिल्हयातील ठोक व घाऊक व्यापारी, किरकोळ विक्रेते, तसेच जनसामान्यामध्ये असंतोष निर्माण झाला असून त्यांनी सदरचा
लॉकडाऊन शिथिल करण्याबाबत या कार्यालयास मोठया प्रमाणात निवेदने सादर केलेली आहे.
**मागच्याच महिन्यामध्ये लावलेल्या लॉकडाऊनला अमरावती जिहयातील व्यापारी व नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला**

Scanned with CamScanner

मंत्री
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
minister_wcd@gov.in

दिनांक :

असल्याने रुग्णसंख्येमध्ये लक्षणीय घट झाली आहे तथापी त्या कालावधी मध्ये अमरावती जिल्हयातील सर्व व्यापारी यांनी स्वत:ची कोरोना चाचणी सुध्दा केलेली आहे. हे वरील रकान्यातील संख्येवरुनर स्पष्टपणे दिसून येते. दिनांक २०/०२/२०२१ ते २८/०२/२०२१ पर्यंत रुग्णसंख्या ही दररोज सरासरी ६०० ते ८०० पर्यंत होती तिच संख्या तदनंतर दिनांक ०१/०३/२०२१ ते दि. ०५/०४/२०२१ पर्यंत सरासरी २०० ते २५० पर्यंत येऊन त्यामध्ये घट झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अमरावती जिल्हयामधील असलेल्या कोरोना रुग्णांच्या संख्येमधील घट, व यापूर्वी लावलेल्या लॉकडाऊन चा विचार करता सद्यस्थितीमध्ये आपण निर्गमित केलेल्या अधिसूचनेबाबत पुर्नविचार करुन अमरावती जिल्हयाकरीता सदरचा लॉकडाऊन शिथिल करण्यात यावा आणि सर्व आस्थापना यांना आपण दिलेल्या कालावधी प्रमाणे सुरु करण्यासंदर्भात आदेशीत करावे तसेच परवानगी देण्यात यावी ही विनंती.

Yashomati Thakur

(ॲड. यशोमती ठाकूर)

प्रति

मा. ना.श्री. उध्दव ठाकरे
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner